# शिशु अतिदक्षता

**डॉ. संजय आहेर यांचे रूग्ण अतिशय स्पेशल आहेत. त्यांच्या निओकेअर हॉस्पिटलमध्ये नवजात बालकांवर उपचार केले जातात.**

डॉ. संजय आहेरांचं निओकेअर हॉस्पिटल हे एक अनोखं ठिकाण आहे. येथे प्रवेश केल्यानंतर तुम्हाला सगळीकडे छान आणि गोंडस बालकांचे फोटो नजरेस पडतात. एवढंच नव्हे तर डॉ. आहेरांच्या कॉम्प्युटरच्या डेस्कटॉपवरही बालकांचीच छबी असते. डॉ. आहेर यांनी निओनाटोलॉजीमध्ये डीएम केलं. त्यानंतर त्यांनी नवजात बालकांसाठी जागतिक दर्जाच्या सर्व अत्याधुनिक सुविधा असलेलं हॉस्पिटल नाशिकमध्ये सुरू केलं. कमी वजनाची बालकं आणि अकाली जन्म झालेल्या बाळांसाठी या हॉस्पिटलच्या रूपाने एक आशेचा किरण दिसला. निओनाटोलॉजी ही पेडियाट्रिक्सची विशेष शाखा आहे. यात नवजात बालकांची, विशेषकरून जे जन्मतःच आजारी असतात किंवा जे वेळेआधीच जन्मलेले असतात अशा बालकांचे उपचार या शाखेत केले जातात. हॉस्पिटलमध्येच दिली जाणारी ही विशेष सेवा असते आणि ती सर्वसामान्यपणे निओनाटल इंटेन्सिव्ह केअर युनिटमध्ये (NICU) दिली जाते. निओनाटोलॉजीमधील रूग्ण म्हणजे नुकतीच जन्मलेली बालकं असतात, ज्यांना प्री-मॅच्युरिटी, लो बर्थ वेट, गर्भात असताना वाढ कमी असणे, गर्भजात विकृती असणे, जंतुसंसर्ग किंवा जन्मानंतर बाळ न रडणे या कारणांमुळे विशेष काळजीची आणि औषधोपचाराची गरज असते.

निफाड तालुक्यातील चांदोरी या खेड्यातील एका सुशिक्षित कुटूंबात डॉ. आहेर यांचा जन्म झाला. त्यांनी पुण्याच्या बीजे मेडीकल कॉलेजमधून एम.डी. केलं आणि त्यांनतर मुंबई येथे केईएममधून निओनाटोलॉजीमध्ये डी.एम. केलं. 'जेव्हा मी उच्च शिक्षणासाठी कॅनडाला गेलो तेव्हा ती माझ्या गावच्या लोकांसाठी खूप अप्रुपाची बाब होती. माझ्या आई-वडिलांना माझा खूपच अभिमान वाटला होता,' ते सांगतात. नाशिकमध्ये थांबण्याचा निर्णय घेण्यात सामाजिक दृष्टिकोनाचा मोठा भाग होता. ते म्हणतात, 'ब्रेन-ड्रेन ही आपल्या देशातील सर्वात मोठी समस्या आहे. मला ऑस्ट्रेलियामधून ऑफर्स होत्या, पण मी नाशिकलाच स्थायिक व्हायचं ठरवलं, कारण आपल्या देशाला चांगल्या डॉक्टर्सची खूप गरज आहे.'


डॉ. आहेर हे गेल्या चार वर्षांपासून नाशिकमध्ये नवजात बालकांचे हॉस्पिटल चालवतात आणि त्यांनी आतापर्यंत गुंतागुंतीच्या आजारांनी ग्रस्त असलेल्या एक हजारपेक्षाही जास्त नवजात बालकांवर उपचार केले आहेत. डॉ. आहेरांचं निओकेअर हॉस्पिटल हे बालकांच्या दृष्टीने अतिशय सुंदर रित्या सजवण्यात आलेलं आहे. 'आम्ही येथे नवजात बालकांसाठी जागतिक दर्जाचं तंत्रज्ञान आयात केलं आहे. ज्या मशिन्सच्या साह्याने मी लंडनमध्ये बालकांवर उपचार करीत होतो, तशीच मशिन्स येथेही मागविली आहेत. आमच्या प्रशिक्षित नर्स बहुतांश केरळहून आलेल्या आहेत. माझ्या प्रत्येक यशाचं श्रेय मी माझ्या एक्स्लंट टीमलाच देतो,' असं ते प्रांजळपणे सांगतात.

त्यांनी नुकतीच लहान बाळांसाठी विशेष रूग्णवाहिका सुरु केली आहे. याविषयी अधिक माहिती देताना ते म्हणतात, 'प्री-मॅच्युअर आणि कमी वजनाच्या बालकांना तात्काळ निओनाटल इंटेन्सिव्ह केअर युनिटमध्ये हलविण्याची गरज असते. यात सर्वात महत्त्वाची बाब असते या मुलांना अशा अवघड परिस्थितीत कशा प्रकारे हॉस्पिटलपर्यंत आणलं जातं. यासाठीच आम्ही आता ही ॲम्ब्युलन्स वापरतो. तिच्यात ट्रान्सपोर्ट इन्क्युबेटर, ट्रान्सपोर्ट व्हेन्टिलेटर, मल्टिपॅरा मॉनिटर्स, सिरींज पम्प्स, ऑक्सिजन, सक्शन मशीन आणि इन्व्हर्टर अशा सर्व अत्याधुनिक यंत्रसामग्री बसविलेली आहे.' नाशिक शहरासह उत्तर महाराष्ट्रात अशा प्रकारची ॲम्बुलन्स सुरु करणारे डॉ. आहेर हे पहिलेच डॉक्टर आहेत.

नुकत्याच झालेल्या एका पाहणीनुसार नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण दर हजारी ४० इतकं आहे. गेल्या काही वर्षांत त्यात थोडी घट झाली आहे. डॉ. आहेर म्हणतात, 'वैद्यकीय क्षेत्रातली ही शाखा झपाट्याने विस्तारते आहे. या क्षेत्रात अतिशय चांगलं भवितव्य आहे. हे एक आव्हानात्मक क्षेत्र असून अनेक विद्यार्थी या क्षेत्रात येत आहेत. बालमृत्यूंचे प्रमाण कमी होण्याचं हे सर्वात मोठं कारण म्हणता येईल. डॉक्टर म्हणून आम्ही आजही बालमृत्यू कसे रोखता येतील, यासाठी प्रयत्नशील असतो.'

व्यवसायातील आव्हानांबद्दल सांगताना डॉ. आहेर म्हणतात, 'नवजात बालकांना त्यांचं काय दुखतंय हे सांगता येत नाही. त्यामुळे आजाराचं निदान अवघड होऊन बसतं. त्यांना सारं काही सांगण्याचा एकच मार्ग माहिती असतो आणि ते म्हणजे रडणं. त्यामुळंच आम्हाला अतिशय काळजी घ्यावी लागते. शेवटी तुम्ही एका बाळाच्या जीवाशी खेळत असतात. पण यापेक्षाही बाळ बरं व्हावं म्हणून कुटूंबियांचा मोठा दबाव आमच्यावर असतो. पालकांना आमच्याकडून खूप अपेक्षा असतात. शेवटी प्रत्येक बाळ अनमोल असतं. आजकाल लहान कुटूंबांचा ट्रेंड वाढतोय. हल्ली अनेक जोडपी एकच मूल ठेवण्याचं प्लॅनिंग करताना दिसतात. त्यामुळे असं एकुलतं एक मुल त्यांना प्राणापेक्षाही प्रिय असतं. त्यामुळे उपचार करताना आमच्यावर प्रचंड दबाव असतो.'

डॉ. आहेर यांनी पोहण्याचा छंद जोपासला आहे. दररोजच्या व्यस्त वेळापत्रकातून ते थोडा वेळ काढून नियमित स्विमिंगचा आनंद घेतात. ते म्हणतात, 'मला मोकळ्या वेळेत पुस्तकं वाचायला आवडतात आणि प्रवास करायला जाम आवडतं. शहरात होणारी नवनवीन रेस्टॉरंटस् मला सतत खुणावत असतात.' अडचणी, कठोर परिश्रम आणि कामाचा दबाव यांतून डॉ. आहेरांना एक वेगळंच समाधान मिळतं. ते म्हणतात, 'जेव्हा मोठ्या जिकिरीने बाळाचा जीव वाचवला जातो किंवा ते पूर्णपणे बरं होतं, त्यावेळी त्याच्या पालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान मला सर्वकाही देऊन जातं. यामुळे अनेक कुटूंबांकडून मला नेहमीच विविध कार्यक्रम, उत्सवांसाठी निमंत्रणं येत असतात. जेव्हा शेवट गोड होतो, तेव्हा सर्वकाही आनंदमय असतं. नाही का?'


» डॉ. संजय आहेर

> "नवजात बालकं त्यांचं काय दुखतंय किंवा काय त्रास होतोय, हे सांगू शकत नाहीत. त्यांना काहीही सांगण्याचा एकच मार्ग माहिती असतो, आणि ते म्हणजे रडणं. त्यामुळंच आम्हाला अतिशय काळजी घ्यावी लागते. शेवटी तुम्ही ज्यावर उपचार करताय ते एक छोटंसं बाळ असतं."



**Dr. Sanjay Aher**
D.M. Neonatology, M.D. Pediatrics
F.N.P.M.(Canada) F.I.N. (Australia & London)
**Neonatal Intensivist**

**Dr. Swati S. Aher**
M.B.B.S.; DOMS
**Ophthalmologist**

Specialized care for babies with special Needs.

Dr. Aher's
**Neocare**
Neonatal Intensive Care Unit & Eye Hospital
**www.neocarehospital.com**
Near Tupsakhare Lawn, Mumbai Naka, Nashik.
Ph. : 0253 - 2318509, Cell : 8055553247

## World class NICU facilities for North Maharashtra Region

**Available facilities For Neonates**

- State of the art **level 3 NICU facilities** to treat critically ill neonates
- World Class **Maquet Servo i** Ventilators
- Fisher & Paykel CPAP with **NeO2Blend Oxygen Blender** to deliver exact concentration of O2 to extremely premature infants
- NICU with **Central Positive Pressure System and Hepafilters**
- Total Parentral Nutrition (**TPN**) facility
- 24hrs pathology, X-ray and Generator backup
- Round the clock trained Pediatricians and NICU Nurses
- Central Compressed Air and Oxygen
- Latest Multipara Monitors, Pulseoxymeters & Syringe Pumps
- Inhouse Hearing Screening, ROP Screening & Laser Theropy
- Neuro Developmental Follow up & Early Intervension.

**Fully Equipped Dedicated Neonatal Transport Ambulance with Transport Incubator and Ventilator**





